सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक,पुणे वन विभाग,पुणे
सेनापती बापट मार्ग, पुणे 411 004
दूरध्वनी – 020 25660593 ई-मेल – dycfpune@gmail.com

क्रमांक-अ/कक्ष-4-2/जमीन/ 649 /2022-23, दिनांक - 07 / 02 / 2023.
पत्र .
प्रति,
मा.मुख्य वनसंरक्षक(प्रा.),
पुणे.

**विषय**:- Proposal for diversion of forest land for construction & strengthenining of VR-23 from MDR-22 to Parawadi, Tehsil Maval, District Pune of Maharashtra State.(FP/MH/ROAD/155799/2022)

संदर्भ- 1) अवर सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्रं.एफएलडी-2022/प्र.क्र.340/फ-10,. दि.1301.2023.
2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,नागपूर यांचेकडील पत्र क्रं.कक्ष-17/नोडल/पुणे/. आयडी- 14235(23)/2695/2022-23, दि.16.01.2023.
3) कार्यकारी अभियंता(इ.व.द.)पुणे जिल्हा परिषद (उत्तर)यांचेकडील पत्र क्रं.जि.प./बांध/रेशा/210/2023, दि.03.02.2023.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.1 अन्वये 1 ते 4 मुदयासंदर्भात अधिक माहिती शासनास सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.2 अन्वये 1 ते 4 त्रृटींचा त्रृटी पुर्तता अहवाल तात्काळ सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

प्रकरणी उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.3 अन्वये त्रृटी पुर्तता अहवाल प्रकल्प यंत्रणा यांनी सादर केला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे मुददेनिहाय अहवााल सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | उपस्थित मुदा | पुर्तता अहवाल. |
|---|---|---|
| 1 | मौजे पारवडी,गट नं.75 येथील प्रस्तावित जमिनीच्या 7/12 उतान्यावर सरकारी मे.पुनर्वसन अधिकारी भिमा लि. प्र. इरिगेशन, अशी नोंद आहे. सबब, सदर जमीन वनजमीन आहे किंवा कसे याची खात्री करावी. | उपवनसंरक्षक,पुणे वनविभाग,पुणे यांचे कार्यालयातील नमुना नं.1 नुसार शासन अधिसूचना क्रं.24एफ दि.01.03.1879 अन्वये सर्व्हे नं.4,6,9,,10,18,43 भारतीय वन अधिनियम 1878 चे कलम 34 प्रमाणे अधिसूचित झालेले आहेत. तसेच अधिसूचना क्रं.8427A, दि.31.10.1895 अन्वये सर्व्हे नंबर 9,10,11 यास रिव्हीजन सर्व्हे नंबर 19 पडलेला दिसून येत आहे. या कार्यालयातील कार्यआयोजना क्षेत्र तपशीलमध्ये तपासणी केली असता सर्व्हे नंबर 19 यास गट नंबर 75 पडलेला दिसून येत आहे. सदर क्षेत्राचा दर्जा हा राखीव वन असा आहे. **सोबत अधिसूचना छायांकित प्रत सलग्न.** |

| | | |
|---|---|---|
| 2 | प्रकल्पासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्राची KML File सादर करावी. | प्रकल्प यंत्रणा यांचेकडील उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.3 अन्वये प्रस्तावित प्रकल्पाची सादर केलली KML File **सोबत 3 प्रतीत सीडी यासोबत जोडून सादर करण्यात येत आहे.** |
| 3 | प्रस्तावित रस्त्याच्या कामासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकिय मान्यता आणि तांत्रिक मान्यता दिली आहे किंवा कसे? असल्यास, प्रशासकिय मान्यतेचे आदेश सादर करावेत. | प्रकल्प यंत्रणा यांचेकडील उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं.3 अन्वये सादर केलेले प्रशासकिय मान्यता आदेश – त्यांचे कार्यालयाकडील आदेश पत्र जा.क्र.बांध/प्र.1/ 3054/सन22-23/मावळ/232/23, दि.19/01/2023. तांत्रीक मंजुरी आदेश मा.अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ यांचे कार्यालयाकडील आदेश जा.क्र.साबांमं./प्रशा/रस्ते 2/618/सन2022, दि.23/01/2023. **सोबत 3 प्रतीत जोडून सादर करण्यात येत आहेत.** |
| 4 | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित क्षेत्राचा 7/12 उतारा सादर करावा. | सदर वळतीकरण प्रस्तावातील क्षेत्र 1 हे. पेक्षा कमी असून पर्यायी वनिकरण क्षेत्र व योजना प्रस्तावित करण्यात आलेली नसून, **सोबत प्रस्तावातील सर्टिफिकेट नं.9 Regarding Land Suitability For Compensatory Afforestation ची छायांकित प्रत 3 प्रतीत सलग्न.** |

सोबत – वरीलप्रमाणे.

(राहुल पाटील,भा.व.से.)
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग,पुणे.

प्रत- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,नागपूर यांना वरीलप्रमाणे माहितीस्तव सविनय सादर.

प्रत- कार्यकारी अभियंता(इ.व.द.)पुणे जिल्हा परिषद (उत्तर) यांना वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहिसाठी अग्रेषित.

प्रत- सहा.वनसंरक्षक(ववसं)पुणे यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहिसाठी अग्रेषित.

प्रत- वनपरिक्षेत्र अधिकारी,वडगाव-मावळ यांना वरीलप्रमाणे माहिती व उचित कार्यवाहिसाठी.